| MHKO120007322024 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १२८/२०२४ मधील</u>**<br>**<u>नि. क्र.१६ वरील आदेश</u>**<br>विक्रम बंडू सुतार<br>वि.<br>जयवंत केशव पाटील |
|---|---|

**<u>आदेश तारीख - ०१/०१/२०२६</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने उपअधिक्षक भुमिअभिलेख यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक व्हावी व दावा मिळकतीची मोजणी व्हावी या करीता दिला आहे.

२. प्रस्तुच्या अर्जामध्ये वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादीयांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असून ती परिस्थिती न्यायालयापुढे येणे आवश्यक आहे. वादी यांनी सन २००६ साली दावा मिळकत खरेदी केली आहे. सन २०१५ साली संबंधित दावा मिळकतीच्या हद्दी निश्चिती झाल्या होत्या व त्याप्रमाणे वादीची कब्जेवहिवाट आहे. सन २०१५ साली केलेली मोजणी व प्रतिवादी यांनी सादर केलेला मोजणी नकाशा यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. प्रतिवादी यांनी केलेल्या मोजणी वेळी वादी यांना कोणतीही नोटीस काढण्यात आली नव्हती. प्रतिवादी यांनी बेकायदेशीररित्या बांधकाम चालू ठेवली आहे व ग्रामपंचायतीच्या नियमांचे पालन प्रतिवादी यांनी केलेले नाही व दावा

मिळकतीमधील अतिक्रमित क्षेत्र निश्चित होण्यास मदत होणार आहे व त्यामुळे उपअधिक्षक भुमिअभिलेख यांची न्यायालयीन नियुक्ती व्हावी व दावा मिळकतीची मोजणी व्हावी अशी विनंती वादीने केली आहे.

३.        प्रतिवादी यांनी नि.क्र.१७ अन्वये त्यांचे म्हणणे सादर केले व त्यांनी असे कथन केले आहे की, दि.०३/०५/२०२३ रोजी शासकीय मोजणी प्रतिवादीने करुन घेतली आहे व त्याबाबत वादीने आक्षेप नोंदविलेला नाही व अर्ज मंजूर केल्यास न्यायालयीन यंत्रणेमार्फत पुरावा गोळा केल्यासारखे होईल त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४.        दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

५.        वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी सदर कामी असा युक्तिवाद केला की, अतिक्रमणाचा विषय असल्यास न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक मोजणी कामी करु शकतील व तसे केल्यास न्यायालयीन यंत्रणेमार्फत पुरावा गोळा केला असे म्हणता येणार नाही. सदर कामी त्यांनी खालील न्यायनिर्णयाचे या न्यायालयाचे लक्ष वेधले.

***१) शुभागा व इतर वि. शोभा व इतर, २००६ एआयआर एस सी डब्ल्यू पान क्र. ४५८८*** मध्ये न्यायनिर्णय देताना आदरणीय सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, जेव्हा एखाद्या मिळकतीची ओळख मोजणीद्वारे होत असेल तेव्हा त्या वेळेस काही तफावती असतील तरी हद्दी, खुणांवरुन मिळकतीची ओळख

करता येऊ शकते.

***२) किसनलाल माणिकलाल राठी वि. दिनकर यशवंत पाटील, २००४ (१) एमएच एल जे,*** मध्ये आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी असे मत व्यक्त केले आहे की, जेव्हा अतिक्रमणाचा विषय येतो, त्यावेळी, मोजणीदाराची नेमणूक दोन्ही गटांची मोजणी करणेकामी दि.प्र.सं. आदेश २६ नियम ९ नुसार करणे उचित होईल.

***३) कमलेशभाई अंबालाल पटेल वि. राजेंद्र नटवरलाल पटेल, २०१४,*** मध्ये न्यायनिर्णय देताना आदरणीय गुजरात उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की, एखाद्या वाद मिळकतीत जैसे थे चा आदेश पारित असताना केवळ त्या मिळकतीचा गट क्रमांक/सर्वे क्रमांकाचा नगररचना नुसार क्रमांक पडला तरी अशा परिस्थीतीत जैसे थे आदेश लागू असताना बांधकाम केले असे पक्षकाराचे म्हणणे होते व त्यामुळे, न्यायालयाचे आदेशाचा अवमान केला व जैसे थे आदेशाचा भंग केला व त्याबाबत अर्ज दाखल केला व त्यामध्ये न्यायालयीन आयुक्तांकडून पाहणी व्हावी अशी मागणी पक्षकाराने केली व त्या परिस्थीतीत न्यायालयीन आयुक्तांची नियुक्तीचा आदेश जो दावा चालविणा–या न्यायालयाने केला तो उचित आहे.

६. प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, दावा हा अतिक्रमित क्षेत्र काढून मिळावे यासाठी केलेला नाही तर दावा हा निरंतर

ताकीदीकरता दाखल केलेला आहे व बांधकाम करु नये व वहिवाटीच्या हक्कात वादीला असे हक्कज्ञापन होऊन मिळावे याकरीता केला आहे व त्यामुळे जेव्हा अतिक्रमण काढून मिळावे अशी मागणी मुख्य दाव्यात नसेल व दावा मनाईसाठी दाखल केला असेल तर अर्ज मंजूर केल्यास पुरावा गोळा केल्यासारखे होईल. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

७.  मुळ दाव्यामध्ये वादीने निरंतर ताकीदीची दाद व दावा मिळकती लगत प्रतिवादीने बांधकाम करु नये अशा स्वरुपाची मागणी देखील केली आहे व वहिवाटीचे हक्काचे हक्कज्ञापन होऊन मिळावे अशी मागणी केलेली आहे. दाव्यामध्ये अतिक्रमण किती क्षेत्रात केले आहे व अंदाजे किती क्षेत्र अतिक्रमि आहे याचा स्पष्ट उल्लेख नाही व परंतु अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळावा अशी देखील मागणी मुख्य दाव्यात नाही. त्यामुळे जेव्हा निरंतर ताकीदीची दाद वादी मागतो तेव्हा अशा परिस्थितीमध्ये अर्ज मंजूर केल्यास न्यायालयीन यंत्रणेमार्फत पुरावा गोळा केल्यासारखे होईल. त्यामुळे अर्ज मंजूर करणे उचित वाटत नाही. त्यामुळे वादीने दाखल केलेल्या ***शुभागा व इतर वि. शोभा व इतर , किसनलाल माणिकलाल राठी वि. दिनकर यशवंत पाटील व कमलेशभाई अंबालाल पटेल वि. राजेंद्र नटवरलाल पटेल*** या न्यायनिर्णयाचे प्रमाणाचा विचार करुन त्या न्यायनिर्णयाचे प्रमाणाचा आदर राखुन या न्यायालयाचे असे मत आहे की, त्या न्यायनिर्णयाचे

प्रमाण वादीला उपयोगी पडत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

| **<u>आ दे श</u>** | |
|---|---|
| १. | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE Date: 2026.04.07 11:34:12 +0530

**गारगोटी.**

दिनांक–०१/०१/२०२६

**(नि. दि. रुद्रभटे )**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

गारगोटी.